# महाराष्ट्र शासन

# राज्य मागासवर्ग आयोग

## महाराष्ट्र राज्य पुणे ११.

## अहवाल क्रमांक - १७.

फेब्रुवारी २००६.

## :प्रस्तावना :

समाजातील विविध विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विविध संघटना/ प्रतिनिधी यांची निवेदने प्रस्तुत आयोगास प्राप्त होत असतात. त्याचप्रमाणे शासनाकडून देखील विविधि निवेदने आयोगाकडे विचारार्थ पाठविली जातात. अशा १२ विविध प्रवर्गातील जाती आणि जमातींच्या निवेदनांवर विचार करुन या अहवाल क्रमांक १७ मध्ये आयोगाने आपले अभिप्राय नमूद केले आहेत.

२. राज्य मागासवर्ग आयोगाकडे आज मितीला एकूण ११६ प्रलंबित प्रकरणांचा क्रमाने व समाजशास्त्रीयदृष्टया सखोल विचार करण्यात येवून उपरोक्त १२ प्रकरणांचा १७ वा अहवाल सादर करतांना मला आनंद होत आहे. पुढे स्वाक्षरी करणारे सध्याच्या विद्यमान आयोगाचे सर्व सन्माननीय सदस्य यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य प्राप्त झाले आहे.

३. सदर अहवालातील शिफारशींबाबत शासनाने आपला अंतिम निर्णय सत्वर द्यावा अशी विनंती आहे. जेणेकरुन अनेक वर्षापासूनच्या प्रलंबित मागण्या निकाली निघू शकतील.

दिनांक १५/२/२००६.

न्यायमूर्ति आर.एम.बापट, ( से.नि.)
अध्यक्ष
राज्य मागासवर्ग आयोग,
महाराष्ट्र राज्य, पुणे ११

STATE BACKWARD CLASS COMMISSION, PUNE

# अहवाल क्रमांक १७ - अनुक्रमणिका.


| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | जातीसमुहाचे नांव | मागणी | शिफारस | अहवालाचा पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८४/९५ | नेवेवाणी | इमावमध्ये समाविष्ट करणे. | मान्य | १ -०६ |
| २ | ११/२००२ | सावतेली | विमाप्रमध्ये समाविष्ट करणे. | अमान्य | ७ - ४६ |
| ३ | १४/२००२ | गाबीत | विमाप्रमध्ये समाविष्ट करणे. | मान्य | ४७- ५६ |
| ४ | ३३/२००२ | भनारा/भनारी/ भनारे | भटक्या जमातीमध्ये समाविष्ट करणे. | मान्य | ५७ - ७० |
| ५ | १३/२००४ | चितारी-जिनगर | चितारी-जिनगरला जिनगरची तत्सम जात म्हणून मान्यता व विमाप्र/भटक्या जमातीमध्ये समाविष्ट करणे बाबत. | जिनगरची तत्सम जात म्हणून मान्य. | ७१ - ८१ |
| ६ | १०९/२००५ | मुस्लीम भांड | विजाभजमध्ये समाविष्ट करणे. | अमान्य तथापि इमावमध्ये मान्य. | ८२ - ९२ |
| ७ | १२८/०५ | महानुभावभोपी मानभाव भोपी | भटक्या जमातीमध्ये समाविष्ट करणे . | अमान्य तथापि इमावमध्ये मान्य. | ९३ - १०८ |
| ८ | १३१/०५ | जैन-कलार | इमावमध्ये कलारची पोटजात म्हणून समाविष्ट करणे. | मान्य. | १०९-११४ |
| ९ | ३७/२००६ | ठाकूर | अनुसुचित जातीचे प्रमाणपत्र मिळणेबाबत. | कार्यक्षेत्रात येत नाही, निकाली. | ११५ |
| १० | ३८/२००६ | मेहतर-वाल्मीकी/लाल -बेगी सुदर्शन. | सुदर्शन समुहाला अनुसुचित जातीचे प्रमाणपत्र मिळणेबाबत. | कार्यक्षेत्रात येत नाही, निकाली. | ११६ |
| ११ | ३९/०६ | तिरमल | निवेदनातील जातींच्या मागण्या मान्य करणेबाबत. | कार्यक्षेत्रात येत नाही, निकाली. | ११७ |
| १२ | ४०/०६ | गोवारी | अनुसुचित जमाती क्रमांक १८ वर गोवारी अशी दुरुस्ती करणेबाबत. | कार्यक्षेत्रात येत नाही, निकाली. | ११८ |

## प्रकरण क्रमांक १४/२००२- गाबीत

### विषय:- गाबीत जातीचा विशेष मागास प्रवर्गात समावेश करणेबाबत.

आवेदक गाबीत समाज मुंबई, जिल्हा शाखा सिधुदुर्ग, तेली आळी, कणकवली, यांचे दिनांक १६/५/९९/ चे मा.मुख्यमंत्री, यांना व दिनांक २.१२.२००० चे मा. केंद्रिय कॅबिनेट मंत्री, रसायन व खते यांना दिलेले निवेदन शासनाचे पत्र क्रमांक सीबीसी-१४/२००० प्रक्र.६६,मावक-५,दिनांक ३.६.२००२ अन्वये तसेच गाबीत समाज मुंबई, बा.वि. जुवेकर, बालमंदिर, फेंडस कॉलनी, भांडूप गांव, भांडूप पूर्व, मुंबई ४२, यांचे दिनांक ९.८.२००३ चे मा. लोकसभा अध्यक्षांना लिहिलेले पत्र शासनाने त्यांचे पत्र क्रमांक सीबीसी-१४/२००३ प्रक्र.३१६,मावक-५,दिनांक २३.६.२००३, तसेच दिनांक २७.१०.२००३, अन्वये व वरील संघटनेचेच दिनांक १३.११.२००३ व दिनांक २८.२.२००४ अन्वयेचे निवेदन आयोगास स्वतंत्रपणे प्राप्त झाले. त्यानुसार किनारपट्टीच्या परिसरातील गाबीत जातीचा समावेश मागासवर्गीय जातीमध्ये / विशेष मागासप्रवर्गामध्ये समावेश करण्याबाबतची आवेदकांची मागणी आहे.

सदर प्रकरणी आवेदकांकडून प्रश्नावली तसेच आवश्यक ते पुरावे मागविण्यात आले. आवेदकांकडून प्रश्नावली तसेच आवश्यक ते पुरावे प्राप्त झाल्यानंतर त्याचा सखोल अभ्यास करण्यात आला. दरम्यान आवेदकांनी त्यांचे पत्र दिनांक १५.४.२००५ अन्वये दिनांक १६.६.२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता गाबीत समाजाचा भव्य मोर्चा आयोजित करण्याबाबत आयोगास नोटीस दिली. आयोगाकडे प्राप्त झालेल्या प्रकरणांवर आयोग क्रमवारीनुसार तसेच नैसर्गिक न्यायतत्वाला धरुन कार्यवाही करीत असल्याने आवेदकांनी आयोगावर मोर्चा काढून दबाव तंत्राचा वापर करु नये असे संबंधितांना कळविले. सदर प्रकरणी विचाराधिन समुहाची जास्त लोकसंख्या असलेल्या मुंबई, ठाणे, रत्नागिरी सिंधुदुर्ग व कोल्हापूर या जिल्हयांचे सर्वेक्षण करुन तसे अहवाल सादर करण्याबाबत संबंधित जिल्हयाचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना कळविण्यात आले. रत्नागिरी जिल्हयातून ३६,ठाणे जिल्हयातून २३, कोल्हापूर जिल्हयातून४, मुंबई जिल्हयातून ५३, अशा एकूण ११६ कुटुंबाच्या मुलाखत अनुसूचि आयोगास प्राप्त झाल्या, त्यामधून काढलेल्या सांख्यिकी माहितीच्या आधारे या समुहास सामाजिक १२ पैकी ७ , शैक्षणिक ८ पैकी २, व आर्थिक ३ पैकी १ असे २३ गुणांच्या निकषानुसार एकूण १० गुण प्राप्त होतात. आयोगाने ठरविलेल्या निकषाच्या आधारे समुहाचा मागासलेपणा निश्चित करण्यासाठी २३ पैकी किमान १२ गुण आवश्यक आहेत. तथापि विचाराधिन समुहास फक्त १० गुण प्राप्त होत असल्याने दिनांक २०.६.२००५ च्या

बैठकीमध्ये गाबीत समुहाची मुंबई, रत्नागिरी व सिंधूदुर्ग जिल्हयाची क्षेत्रपाहणी करण्याचे काम आयोगाचे मा. सदस्य श्री. गायकवाड, व मा. सदस्य डॉ श्री भामरे,यांना दिले होते. त्यानुसार मुंबईची क्षेत्रपाहणी करण्यात आली, तथापि अतिवृष्टीमुळे रत्नागिरी व सिंधूदुर्ग जिल्हयाची क्षेत्रपाहणी होवू शकली नाही, पावसाळा संपल्यानंतर क्षेत्रपाहणी करण्याचे दिनांक २३ .८.२००५ च्या बैठकीत ठरले. दरम्यान आवेदकांनी त्यांचे पत्र दिनांक २९.८.२००५ अन्वये दिनांक १३.१०.२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता गाबीत समाजाचे कार्यकर्ते आयोगाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार असल्याबाबत आयोगास नोटीस दिली. यावर आयोगाकडे प्राप्त झालेल्या प्रकरणांवर आयोग क्रमवारीनुसार तसेच नैसर्गिक न्यायतत्वाला धरुन कार्यवाही करीत असल्याने गाबीत समाजाच्या कार्यकर्त्यांनी आयोगाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसू नये व दबाव तंत्राचा वापर करु नये असे संबंधितांना कळविले. दिनांक ६ व ७ ऑक्टोबर २००५ रोजीच्या बैठकित गाबित समुहाची रत्नागिरी व सिंधूदुर्ग जिल्हयाची क्षेत्रपाहणी, मा. सदस्य डॉ श्री भामरे, व प्राचार्य श्री .डी.के. गोसावी यांनी गाबित समुहाची रत्नागिरी व सिंधूदुर्ग जिल्हयाची क्षेत्रपाहणी करुन पुढील बैठकीत क्षेत्रपाहणी अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले. त्याप्रमाणे आयोगाचे मा. सदस्य डॉ श्री भामरे, व प्राचार्य श्री .डी.के. गोसावी , यांनी दिनांक ११ ऑक्टोबर ते १५ऑक्टोबर २००५ या कालावधीत रत्नागिरी व सिंधूदुर्ग जिल्हयामध्ये ज्या ठिकाणी गाबीत समुहाची लोकसंख्या जास्त आहे त्या भागाची क्षेत्रपाहणी केली, व आपला अहवाल दिनांक ३०/१२/२००५ च्या बैठकीत सादर केला.

**गाबीत समुहाचे क्षेत्रपाहणी अहवालाचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.**

१. गाबीत समुहाची वस्ती मुख्यप्रवाह वस्तीपासून बरीच दूर महामार्गापासून २० ते २५ कि.मी. आंत आहे.त्या ठिकाणी सहज पोहचता येत नाही.

२. गाबीत समुहाची बोलीभाषा कोकणी आहे, व त्यांच्यातील लोकसाहित्य तसेच नृत्याची प्रथा अजूनही चालू आहे.

३. गाबीत समुहाचा उपर्जिविकेचा मुख्य व्यवसाय मच्छीमारी असून आजही ९० ते ९५ टक्के लोक ह्याच व्यवसाय करीत आहेत.

४. रक्त संबंधावर अधारित वांशिक गटांचे ऐक्य समाजामध्ये आजही टिकून आहे.

**Report of the Backward classes Commission of India Volume II- Page No.27:** List of the Other Backward Classes as recommended by the Backward Classes Commission Sr.No.85 & 93 **shows Gabit as most backward community.** अशी नोंद आढळते.

एकंदरीत केलेल्या क्षेत्रपाहणीवरुन असे लक्षात आले की - गाबीत हा मच्छीमारी करणारा समाज असून सध्या तो ओ.बी.सी. या प्रवर्गात मोडतो. ओ.बी.सी.च्या सवलती हया समाजास मिळतात व त्याचा फायदा शिक्षणासाठी घेतला जातो. सामाजिक व आर्थिकदृष्टया हा समाज अजूनही खूप मागासलेला असल्याचे दिसून आले. उपजिविकेसाठी मासे पकडणे व मासेविक्री करणे हाच प्रमुख व्यवसाय आहे. परंतू दिवसेंदिवस हया व्यवसायावर यांत्रिकी करणाचा व इतर धनाढ्य लोकांनी हया व्यवसायात शिरकांव केल्यामुळे हया समाजाच्या लोकांना खूप हालअपेष्टा भोगाव्या लागत आहेत. सरकारी नोकरीतील हया जातीच्या लोकांचा सहभाग अतिशय नगण्य आहे. तसेच राजकारणातील सहभागही अत्यंत कमीच आहे ( कांही अपवाद सोडून ).

**शिफारस :-**

१. पूर्वीच्या मुंबई इलाख्यातील रत्नागिरी व सांवतवाडी जिल्हयाच्या प्रसिध्द झालेल्या गॅझेटीअरच्या पृष्ट क्रमांक १२७ वर गाबीत हया स्वतंत्रजातीचा उल्लेख केलेला आहे.

२. सेन्सस ऑफ इंडिया ( १९११) या सरकारी प्रकाशनानेही गाबीत हया स्वतंत्रजातीचा उल्लेख पृष्ट क्रमांक २५६ वर केलेला आहे.

३. हा समाज सन १९३४ ते १९४४ हया कालावधीत इतर मागासप्रवर्गात (OBC) होता.

४. २० सप्टेंबर १९३९ रोजी त्यावेळच्या मुंबई सरकारकडे गाबीत हे नांव बदलून कोकणी मराठा असे नामांतर करण्याबाबतचे निवेदन पाठविण्यात आले असून चौकशी केल्यानंतर ६ जून १९४१ रोजी मुंबई सरकारने पत्र पाठवून नांव बदलून देण्यास विरोध केला. मात्र १९४४ पासून इतर मागासवर्गातून हया समाजास वगळण्यात आले.

५. सन १९८० मध्ये गाबीत समाजाची राज्यस्तरीय संस्था / संघटना निर्माण झाली. संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केल्यावर सन १९८३ पासून इतर मागासवर्गाच्या सवलती मिळू लागल्या व त्याचा फायदा घेतला जात आहे.

६. मा. काकासाहेब कालेलकर हयांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मागासवर्ग आयोगाने सन १९५५ मध्ये केंद्र सरकारकडे सादर केलेल्या अहवालात गाबीत हया समाजाला अत्यंत मागासवर्ग( Most Backward Class ) म्हणून ठरविले.

७. महाराष्ट्रात ज्या मच्छीमार व तत्सम जाती - २१ जाहिर केल्यात त्यातील १४ जाती सध्या विशेष मागासप्रवर्गात समाविष्ट आहेत. १५ वी भोई ही जात भटक्या जमाती ( NT - B) ब मध्ये समाविष्ट केली आहे. परंतू त्याच कोळी व तत्सम यादीतील अ.क्र. १६ वी गाबीत हया जातीला हया प्रवर्गातून वगळण्यात आलेले आहे. हा गाबीत समाजावर एक प्रकारचा अन्याय आहे असे वाटते.

वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता तसेच क्षेत्रपाहणी अहवाला सोबत सादर केलेली कागद पत्रे संदर्भ ग्रंथाची व त्यांच्या एकूण सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक परिस्थितीच्या दृष्टीने क्षेत्रपाहणीवरुन गाबीत समुहाचा समावेश विशेष मागास प्रवर्गामध्ये करण्याविषयीची शिफारस आयोगाचे मा. सदस्य डॉ श्री भामरे, व प्राचार्य श्री .डी.के. गोसावी, यांनी केली. सदर बाबत बैठकीमध्ये सखोल चर्चा होऊन क्षेत्रपाहणी अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात आला. वरील क्षेत्रपाहणी अहवाल व सादर केलेले पुरावे यावरुन गाबीत समुहाचा समावेश विशेष मागास प्रवर्गामध्ये करण्याविषयीची आयोगाची एकमताने शिफारस आहे.

न्या.मू. आर.एम. बापट,
अध्यक्ष,
राज्य मागासवर्ग आयोग,
महाराष्ट्र राज्य, पुणे ११.

डॉ. अनुराधा भोईटे, सदस्या-पुणे
राज्य मागासवर्ग आयोग
महाराष्ट्र राज्य, पुणे ११.

डॉ. सुरेश भामरे, सदस्य-मुंबई
राज्य मागासवर्ग आयोग,
महाराष्ट्र राज्य, पुणे ११.

डॉ.एस.जी.देवगांवकर-सदस्य, नागपूर
राज्यमागासवर्ग आयोग
महाराष्ट्र राज्य, पुणे ११.

लक्ष्मण गायकवाड, सदस्य-औरंगाबाद,
राज्य मागासवर्ग आयोग.

डी.के.गोसावी, सदस्य-नाशिक,
राज्य मागासवर्ग आयोग.

मा. सी.बी. देशपांडे,सदस्य-अमरावती
राज्य मागासवर्ग आयोग.

भा.ज.सासणे,
सदस्य-सचिव,
राज्य मागासवर्ग आयोग.

STATE BACKWARD CLASS COMMISSION, PUNE. MAHARASHTRA

## गाबीत समाजाचा क्षेत्रपाहणी अहवाल.

प्रति:

मा. अध्यक्ष.
राज्य मागासवर्ग आयोग,
महाराष्ट्र शासन, पुणे १३.

### विषय :- गाबीत समाजाचा क्षेत्रपाहणी अहवाल.

महोदय,

वरील विषयाच्या संदर्भात दिनांक ६ व ७ ऑक्टोबर २००५ च्या राज्य मागासवर्ग आयोगाच्या पुणे येथील बैठकीत मा. अध्यक्षांनी दिलेल्या आदेशानुसार राज्य मागासवर्ग आयोगाचे मा. सदस्यव्दय डॉ. सुरेश भामरे,( मुंबई), व प्राचार्य डी.के.गोसावी ( नाशिक) हयांनी दिनांक १३ ऑक्टोबर २००५ ते १५ ऑक्टोबर २००५, हया कालावधीत रत्नागिरी व सिंधुदूर्ग हया जिल्हयांचा दौरा केला. त्या दौऱ्याचा क्षेत्रपाहणी अहवाल आयोगाच्या बैठकीपुढे सादर करण्यात येत आहे.

**रत्नागिरी दौरा :-** दिनांक १३ ऑक्टोबर २००५ ला पवई ( मुंबई) येथून दुपारी १.०० वाजता निघून रात्री ८-३० वाजता रत्नागिरी येथे पोहोचलो. दिनांक १४ ऑक्टोबर २००५ सकाळी ९.०० वाजता जिल्हा विशेष समाज कल्याण अधिकारी श्री मुरकुटे साहेब, व त्यांचा स्टॉफ त्यांच्यासमवेत सकाळी १०.०० वाजता रत्नागिरी येथील समुद्र किना-यालगत असलेल्या भगवती देवी वसाहतीत गाबीत समाजाच्या घरोघरी जावून प्रत्यक्ष तेथील स्त्रीया पुरुषांशी व मुलांशी संपर्क साधून चर्चा केली. हया वसाहतीत गाबीत समाजाची ३०/३५ कुटूंबे राहतात. हया कुटूंबापैकी २ कुटूंबाची घरे, सिमेंट कॉंक्रीटची बंगले स्वरुपात असून सर्व आधुनिक सुखसोई हया ठिकाणी आढळून आल्यात. श्री विष्णू तुकाराम शेलटकर हे रत्नागिरीचे **गाबीत** समाजाचे अध्यक्ष असून श्री सुधाकर गोपाळ मोंडकर हे उपाध्यक्ष आहेत, तसेच ते माजी नगरसेवक आहेत. हयांचा मुलगा बी.कॉम असून मुलगी एल.एल.बी.चे शिक्षण घेत आहे. श्री सचिन रामचंद्र मोंडकर, हे इंजिनिअर आहेत. श्री अनंत रामचंद्र ढोके, हयांच्या मुली इंजिनिअरींग व बी.एस.सी. पदव्यांचे शिक्षण घेत आहेत.

श्री नितीन प्रभाकर सारंग, श्री काशिनाथ दळवी, श्री सुरेश पोशे, श्री भास्कर गोपाळ सारंग, तसेच सौ.माधुरी मोंडकर, श्री कमलाकर शिवराम ढोके, श्री अनंत शिवराम ढोके, श्री राजेंद्र अनंत तांडेल, श्री रमेश जगन्नाथ दळवी, इत्यादिंना समक्ष त्यांच्या घरी जावून व भेटून चर्चा केली.

त्यांच्या बरोबर झालेल्या चर्चेमधून खालील प्रमाणे माहिती मिळाली. तीन पिढयांहून जास्त काळ हया समाजाची वस्ती हया ठिकाणी आहे. एक/दोन बंगल्यांचाअपवाद सोडल्यास बाकीची सारे घरे कौलारु छताची व सिमेंटच्यापत्र्याची आहेत.घरामध्ये सर्व नागरी सुविधा आढळून आल्यात. त्यांच्या घरामध्ये ४/५/६ ,खोल्या आढळून आल्यात. सर्व साधारणपणे पुरुष मंडळी मासेमारी करतात. तर घरातील स्त्रिया / मुली मासेविक्रीचे काम करतात. पावसाळयाचे ४ महिने मासेमारी बंद असते. मासेमारीसाठी लाकडी होडयांचा वापर करुन , हाताने वल्हवून होडी चालविली जाते.

शिक्षणाच्या बाबतीत विचारले असता,ओ.बी.सी.च्या सवलती घेतात . मुलींचे शिक्षण सर्वसाधारण १० वी पर्यंत ( कांही अपवाद सोडून) तर मुलांचे शिक्षण पदवीपर्यंत बी.ए. /बी.कॉम पर्यंत झालेले आहे. शिक्षण घेऊनही, नोकऱ्या मिळत नसल्याने, सुशिक्षित मुलेही घरातील मासेमारीचा पारंपारीक व्यवसाय करीत आहेत. **गाबीत** समाजाचे ओ.बी.सी. दाखले काढलेले आहेत. मात्र शाळा सोडल्याच्या दाखल्यावर **हिंदू-मराठा** अशा नोंदी असल्याचे दिसले.हया बाबत विचारले असता, त्यांनी सांगितले की, हा समाज पूर्वी शिवाजी महाराजांच्या आरमारात होता. दोन खडकामधील **गाभीत** जाऊन (गॅप मधून) मासे धरण्याचे काम करीत असल्याने आम्हाला **गाबीत** असे नांव पडले आहे. मुलींची लग्ने साधारणत: वय वर्षे १८ ते २५ च्या दरम्यान केली जातात. तर मुलांची लग्ने वयाच्या २५ ते ३० च्या दरम्यान केली जातात. लग्नामध्ये हुंडा पध्दती नाही. लग्नाचा खर्च वर-वधू पक्षांकडून निम्मा निम्मा केला जातो. लग्नाचा सोहळा ऐपतीनुसार केला जातो .येथील समाजाचे **भगवती देवीचे** मंदीर हे ग्रामदैवत असून,देवगड येथील **पावनाई** देवी कुलस्वामीनी आहे.

कुटुंब प्रमुखाला व्यवसायाच्या उत्पनाविषयी विचारले असता सर्व साधारणपणे वर्षाला रुपये १० ते १५ हजाराच्या दरम्यान उत्पन्न मिळते. स्थानिक बाजारपेठेत माशांची विक्री केली जाते. माशांची साठवण करण्यासाठी मोठी कोल्ड स्टोरेज नाहीत. तर बर्फामध्ये माशांची साठवणूक केली जाते. आता या व्यवसायात केरळ गोवा या सागर पट्टीतील पारशी, इराणी व ख्रिश्चन लोकांनी प्रवेश केला असून यांत्रिकी बोटींच्या साहयाने मासेमारी केली जात असल्याने , आमच्या मच्छीमारी व्यवसायावर संकट कोसळले आहे. त्यांच्या स्पर्धेत आम्ही टिकू शकत नाही. हयाच व्यवसायावर आम्ही कुटुंबाची गुजराण करीत असतो. उत्पनाचे दुसरे साधन नाही. वर्षातील आठच महिने हा व्यवसाय असतो. उरलेले चार महिने होडीची दुरुस्ती जाळयाची दुरुस्ती किंवा नवीन जाळे विणणे ही कामे करत असतो. शिकलेली कांही माणसे मिळेल ते काम करण्यासाठी मुंबईकडे जातात. परंतु नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण खूपच अत्यल्प आहे. मच्छमारीच्या व्यवसायात पुरक धंदा शेतजमीन पिकविणे किंवा फळबागा लावणे इत्यादी व्यवसाय आम्ही करीत नाही, त्यामुळे आर्थिकदृष्टया आम्ही खूपच कुमकुवत आहोत.

अध्यक्ष

**सिंधुदुर्ग जिल्हा क्षेत्रपाहणी :-** दिनांक १४ ऑक्टोबर २००५ रोजी दुपारी २.०० वाजता मालवण येथे जाण्यासाठी निघालो. आमच्या समवेत गाबीत समाजाचे पदाधिकारी / कार्यकर्ते सर्वश्री श्री सखाराम मालाडकर गाबीत समाजाचे प्रदेश अध्यक्ष , श्री शंकर हरी पोशे, श्री सुरेश वापडेकर, श्री सुनिल जोशी श्री सदानंद तांडेल, श्री आनंद मेयर, ही सुनिल परब, श्री बाबाजी कोंभडे व श्री तानाजी कांदळगांवकर, (माजी कार्पोरेटर- मुंबई महानगरपालिका) हे होते.

**सागरी मार्गाने प्रवास :-** मुंबई- गोवा राज्य महामार्गापासून साधारणत: २०/२५ किलोमीटर्स आंत, सागरी महामार्गाने - सागरी किनाऱ्यावर असलेल्या गाबीत समाजाच्या वस्त्यामध्ये समक्ष जाऊन पहाणी करुन व त्यांचेशी चर्चा करुन माहिती घेण्यात आली.

**भेट दिलेल्या वस्त्या :-**

१. जुने जैलपूर - सागरा किनारी गाबीत समाजाची १०० घरे आहेत. व्यवसाय - मच्छिमारीचा.

२. राजापूर - आयोळगड - वस्ती ५. घरे.

३. सागवे - वडपवाडी - वस्ती १२० घरे.

४. देवगढ - आनंदवाडी ८० घरे असून एकूण १२० कुटुंबे हया वस्तीमध्ये राहतात.

श्री अजित राजाराम कोयंडे, श्री सिताराम अर्जून कायंडे, श्री माधव कुबल, श्री बाबा धूरी (गांवडे पाटील) हयांच्या घरी जाऊन चर्चा करुन माहिती घेण्यात आली. संपूर्ण वस्ती सागर किनाऱ्यावर बसलेली आहे. हया वस्तीमध्ये लोकवर्गणी मधून विठ्ठल मंदीर व गणपतीचे मंदीर बांधले आहे. दरवर्षी हरिनाम सप्ताह, तसेच कामिका एकादशी, शिमगा उत्सव असे उत्सव - सण एकत्ररित्या साजरे केले जातात. समाजातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी **पंचायत** भरते व त्या ठिकाणी न्यायनिवाडा केला जातो. जेथील वस्तीमध्ये बुजूर्ग व्यक्तीबरोबर, तसेच तरुणा बरोबर चर्चा केली असता, त्यांनी सांगितले की, **मच्छीमारीचा व्यवसाय** अत्यंत बिकट झाला आहे. पर्शियन - बोटीमुळे , आमच्या धंदयावर खूप वाईट परिणाम झाला आहे. त्यात डिझेलचे दर वाढले आहेत. रात्री १.३० ते २.०० च्या सुमारास लाकडी- होडयावर , प्रत्येक होडीवर ५/६ माणसे असतात व सकाळी ७.०० वाजेपर्यंत मासेमारी केली जाते. यांत्रिकी होडयांमुळे आम्हाला मासे मिळण्याचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. तसेच मासळीला म्हणावे तो भाव / पैसे ही मिळत नाही. जिवावर उदार होवून निसर्गाशी सामना करीत हा व्यवसाय आम्ही वर्षानुवर्षे करीत आहोत.

गाबीत समाजाची ८०% टक्के वस्ती सिंधुदूर्ग जिल्हयात आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांनी सांगितलेल्या माहितीनुसार ( संघटनेने सर्व्हेक्षण केलेले आहे. ) गाबीत समाजाची तालुकानिहाय वस्ती व लोकसंख्या खालील प्रमाणे आहे.

४..

अध्यक्ष
राज्य मागासवर्ग आयोग
महाराष्ट्र राज्य, पुणे

**मालवण तालुका :-** एकूण लोकसंख्या ३५,०००.

वस्त्या- देवबाग, तारकर्ली, भायरी, तांडी, मालवण-बाजारपेठ, मेढा,धुरीवाडा, कोळम,सकोट,तळाशील , तोंडवळी, आचरा- जिवावाडी, बेलणे-रामगढ, राजकोट, मिर्याबांदा, माडली, धाकटी दाभोळी.

**वेंगुर्ला तालुका :-** एकूण लोकसंख्या २५,०००.

दाभोसवाडी, मुठ, उभा-दांडा, बायंगणी, केलुस,खवणे, कोचरा-श्रीरामवाडी, निवतीवाडी,मानसी- वाडी, गिरप-वाडी, शिरोडे, आरोंदे, भोये-माड, बांदेटाक, केरवाडा, केळस,खवणे, कालाबी बंदर, रेड्डी.

STATE BACKWARD CLASS COMMISSION, PUNE. MAHARASHTRA

**कुडाळ तालुका :-** एकूण लोकसंख्या ८,०००.

कवटी, शिपयेतूवाडी.

**देवगड तालुका :-** एकूण लोकसंख्या ३५,०००.

मंचे, वाघोटण, तिरलोट-अंबेरी, गिरे बांधेवाडी, विजयदुर्ग, वाणीवरे, मोंडतर, सुंदरवाडी, साईनगर, तांडनवीरवाडी, वाजतर, गडीतामाणे, तळीबाजार, टेंभेवली, कालावी, कट्टा, पिरवाडी, जामसंडे-वाजतर, पालाये, मळई, आनंदवाडी, देवगड भिल्ला, देवगड-सडा,तारामुंबरी, मिठमुंबरी, कानखेल, कुणकेश्वर, दहिगांव, मिठबाव, मोरवे, आडबंदर.

**कणकवली तालुका :-** एकूण लोकसंख्या १,५००.

तेलीअळी, खारेपाटण, वऱ्हाड.

**पदाधिकाऱ्यांबरोबर झालेली चर्चा :-**

दिनांक १५/१०/०५ रोजी सकाळी ९-०० वाजता गाबीत समाजाचे पदाधिकारी व कार्यक त्यांबरोबर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये श्री सुबोध सुभाष आचरेकर - मालवणचे नगराध्यक्ष, श्री अशोक लाडोबा तोडणकर,- माजी नगराध्यक्ष, व विद्यमान नगरसेवक श्री श्रीकृष्णा सावळीराम तांदळकर - सिंधुदूर्ग जिल्हा अध्यक्ष, गाबीत समाज, श्री तुळशीदास परशुराम गावकर मालवण तालुकाअध्यक्ष, गाबीत समाज, व इतर कार्यकर्ते हजर होते. त्याचदिवशी सिंधुदूर्ग नगरी ( ओरोस- सिंधुदूर्ग जिल्हयाचे ठिकाण ) येथे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री आर. के.पोवार, व निरिक्षक श्री धर्मगिरी गोसावी तसेच ओ.बी.सी. कॉर्पोरेशनचे जिल्हाव्यवस्थापक यांचेबरोबर चर्चा करण्यात आली. त्यावेळी गाबीत समाजाच्या कांही व्यक्तींना ओ.बी.सी. कॉर्पोरेशनतर्फे रुपये ५०,०००/- पर्यंतचे कर्ज मच्छीमारीच्या व्यवसायासाठी तसेच किराणा स्टोअर्ससाठी देण्यात आल्याचे कर्जवाटप रजिस्टरवरून दिसून आले.

अध्यक्ष

एकंदरीत केलेल्या क्षेत्रपाहणीवरुन असे लक्षात आले की - गाबीत हा मच्छीमारी करणारा समाज असून सध्या तो ओ.बी.सी. या प्रवर्गात मोडतो. ओ.बी.सी.च्या सवलती हया समाजास मिळतात व त्याचा फायदा शिक्षणासाठी घेतला जातो. सामाजिक व आर्थिकदृष्टया हा समाज अजूनही खूप मागासलेला असल्याचे दिसून आले. उपजिविकेसाठी मासे पकडणे व मासेविक्री करणे हाच प्रमुख व्यवसाय आहे. परंतू दिवसेंदिवस हया व्यवसायावर यांत्रिकी करणाचा व इतर धनाढ्य लोकांनी हया व्यवसायात शिरकांव केल्यामुळे हया समाजाच्या लोकांना खूप हालआपेष्टा भोगाव्या लागत आहेत. सरकारी नोकरीतील हया जातीच्या लोकांचा सहभाग अतिशय नगण्य आहे. तसेच राजकारणातील सहभागही अत्यंत कमीच आहे ( कांही अपवाद सोडून ).

**शिफारस :-**

१. पूर्वीच्या मुंबई इलाख्यातील रत्नागिरी व सांवतवाडी जिल्हयाच्या प्रसिध्द झालेल्या गॅझेटीअरच्या पृष्ट क्रमांक १२७ वर गाबीत हया स्वतंत्रजातीचा उल्लेख केलेला आहे.

२. सेन्सस ऑफ इंडिया ( १९११) या सरकारी प्रकाशनानेही गाबीत हया स्वतंत्रजातीचा उल्लेख पृष्ट क्रमांक २५६ वर केलेला आहे.

३. हा समाज सन १९३४ ते १९४४ हया कालावधीत इतर मागासप्रवर्गात (OBC) होता.

४. २० सप्टेंबर १९३९ रोजी त्यावेळच्या मुंबई सरकारकडे गाबीत हे नांव बदलून कोकणी मराठा असे नामांतर करण्याबाबतचे निवेदन पाठविण्यात आले असून चौकशी केल्यानंतर ६ जून १९४१ रोजी मुंबई सरकारने पत्र पाठवून नांव बदलून देण्यास विरोध केला. मात्र १९४४ पासून इतर मागासवर्गातून हया समाजास वगळण्यात आले.

५. सन १९८० मध्ये गाबीत समाजाची राज्यस्तरीय संस्था / संघटना निर्माण झाली. संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केल्यावर सन १९८३ पासून इतर मागासवर्गाच्या सवलती मिळू लागल्या व त्याचा फायदा घेतला जात आहे.

६. मा. काकासाहेब कालेलकर हयांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मागासवर्ग आयोगाने सन १९५५ मध्ये केंद्र सरकारकडे सादर केलेल्या अहवालात **गाबीत** हया समाजाला अत्यंत मागासवर्ग( Most Backward Class ) म्हणून ठरविले.

७. महाराष्ट्रात ज्या मच्छीमार व तत्सम जाती - २१ जाहिर केल्यात त्यातील १४ जाती सध्या विशेष मागासप्रवर्गात समाविष्ट आहेत. १५ वी भोई ही जात भटक्या जमाती ( NT - B) ब मध्ये समाविष्ट केली आहे. परंतू त्याच कोळी व तत्सम यादीतील अ.क्र. १६ वी गाबीत हया जातीला हया प्रवर्गातून वगळण्यात आलेले आहे. हा गाबीत समाजावर एक प्रकारचा अन्याय आहे असे वाटते.



अध्यक्ष

वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता ( सर्वेक्षण, क्षेत्रपाहणी, चर्चा व सादर केलेली कागद पत्रे संदर्भ इत्यादी ) गाबीत समुहाचा समावेश विशेष मागास प्रवर्गामध्ये ( Special Backward Class ) करण्याविषयीची शिफारस आयोगाचे सदस्यव्दय डॉ श्री भामरे, व प्राचार्य श्री .डी.के. गोसावी, हे करीत आहेत. राज्य मागासवर्ग आयोगासाठी हा अहवाल विचारार्थ सादर करीत आहोत.

**शिफारस :- मुद्दा क्रमांक ७ :**

महाराष्ट्रात ज्या मच्छीमार व तत्सम जाती - २१ जाहिर केल्यात त्यातील १४ जाती सध्या विशेष मागासप्रवर्गात समाविष्ट आहेत. १५ वी भोई ही जात भटक्या जमाती ( NT - B) ब मध्ये समाविष्ट केली आहे. परंतू त्याच यादीतील अ.क्र. १६ वी गाबीत हया जातीला विशेष मागासवर्ग हया प्रवर्गातून वगळण्यात आलेले आहे.

विशेष मागास प्रवर्गाची लक्षणे /वैशिष्टये हया समाजास लागू पडतात, हे सर्वेक्षण व क्षेत्रपाहणी केली असता दिसून येते. ती वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत.

१. गाबीत समुहाची वस्ती मुख्याप्रवाह वस्तीपासून बरीच दूर महामार्गापासून २० ते २५ कि.मी. आंत आहे.त्या ठिकाणी सहज पोहचता येत नाही.
२. गाबीत समुहाची बोलीभाषा कोकणी आहे, व त्यांच्यातील लोकसाहित्य तसेच नृत्याची प्रथा अजूनही चालू आहे.
३. गाबीत समुहाचा उपजिविकेचा मुख्य व्यवसाय मच्छीमारी असून आजही ९० ते ९५ टक्के लोक हाच व्यवसाय करीत आहेत.
४. रक्त संबंधावर अधारित वांशिक गटांचे ऐक्य समाजामध्ये आजही टिकून आहे.

वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता ( सर्वेक्षण, क्षेत्रपाहणी अहवाल , सादर केलेली कागद पत्रे संदर्भ इत्यादी ) गाबीत समुहाचा समावेश विशेष मागास प्रवर्गात ( Special Backward Class ) करण्याविषयीची शिफारस आयोगाचे सदस्यव्दय डॉ सुरेश भामरे, व श्री .डी.के. गोसावी, हे करीत आहेत.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( प्राचार्य डी.के.गोसावी ) | ( डॉ. सुरेश भामरे ) |
| सदस्य | सदस्य |

राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे .